पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२५/०७/२०२३
## दि.२४/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

### भाग-१ ते ५ चे गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | उत्तमनगर पो स्टे ८५/२०२३,भादविक ४३५,३४ |
| **फिर्यादी** | रोहीत पायगुडे,वय २६ वर्षे,रा.संस्कार कॉलनी खडकमाळ कोंढवे-धावडे पुणे |
| **आरोपीत** | दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०७/२०२३ रोजी रात्रौ ०२/२९ वा.ते ०२/३२ वा.चे दरम्यान फिर्यादी यांचे रहाते इमारतीचे पार्किंग मध्ये संस्कार कॉलनी खडकमाळ कोंढवे-धावडे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे रहाते इमारतीचे पार्किंग मध्ये त्यांची इलेट्रीक दुचाकी पार्क केली असताना, यातील नमुद दोन अनोळखी इसमांनी,कोणत्यातरी अज्ञात कारणावरुन फिर्यादी यांची इलेट्रीक दुचाकी गाडीस आग लावुन,सदर वाहनाचे अंदाजे ४८०००/- रु किचे नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, नांगरे ९६०५९९३३९५ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १२१/२०२३,भादविक ३२४,३२३,५०६,३४ |
| **फिर्यादी** | रोहन पवार,वय-२१ वर्षे,रा.शेलारचाळ,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर तीन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०७/२०२३ रोजीचे १४/३० वा. रुबी हॉस्पिटलचे आऊट गेट समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मंगलदास रोडवरील कॅनॉट प्लेस येथील कॅफे चिजी क्रिमीक हॉटेलकडे जात असताना यातील नमुद इसमाने फिर्यादी व त्याचेमध्ये असलेल्या जुन्या आर्थिक देवाण-घेवाणीच्या कारणावरुन फिर्यादीस शिवीगाळ केली. सदरबाबत फिर्यादी यांनी त्यास जाब विचारत असताना,इतर साथीदार यांनी संगनमत करून,फिर्यादीस लाथा-बुक्यांनी व लाकडी दांडक्यांने मारहाण केली. त्यानंतर फिर्यादी हे त्यांचे वडिलांसोबत उपचाराकरीता ससुन हॉस्पिटल येथे गेले असताना,हॉस्पिटलचे बाहेर सदर इसमांनी,तु कोणावर हात उचलला आहेस हे तुला माहित आहे का असे म्हणुन त्यांना धमकी दिली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. श्रीकांत सावंत ९५५२५५६४२४ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोरेगांव पार्क पो स्टे १२२/२०२३,भादविक ३२६,३२४,३२३,५०६,३४ |
| **फिर्यादी** | वैभव शेंडगे,वय-३१ वर्षे,रा.कात्रज,अंबेगाव,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचा एक साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२२/०७/२०२३ रोजीचे १४/३० वा. रुबी हॉस्पिटलचे आऊट गेट समोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मंगलदास रोडवरील कॅनॉट प्लेस येथील शॉप क्र.५६,५७ वर असताना,यातील नमुद इसमाने फिर्यादी यांचेकडे पैशांची मागणी करुन,तु शॉप बाहेर ये,नाहीतर तुझे कॉफी शॉप तोंडुन,तुझी वाट लावुन टाकेल अशी धमकी देवुन,त्याचे इतर साथीदाराचे सहाय्याने फिर्यादीस शिवीगाळ व धक्का-बुक्की करुन,छोटा चाकुने माझे डोक्याचे दोन्ही बाजुस,डाव्या हाताचे दंडावर व पोटावर डाव्या बाजुस वार करुन मला गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. नवनाथ क्षिरसागर ७०३८११५३३४ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**